# RTE Act - २००९ अंतर्गत
## शाळा मान्यता (नमुना - दोन)

ग्राम :- चंद्रपूर
दुरध्वनी :- ०७१७२-२५२५६०
ई मेल :-eopzpchandrapur@gmail.com
फॅक्स :- ०७१७२-२५२५६०
जावक क्र.:- जि.प.चं.प्रा./RTE/शा.मा./ २१०८/२०२१
दिनांक :- 13 / 9 /२०२१
जिल्हा शिक्षणाधिकारी (प्राथ.) यांचे कार्यालय,
जिल्हा - चंद्रपूर, राज्य - महाराष्ट्र

**प्रति,**

**अध्यक्ष / सचिव**

**नेवजाबाई हितकारिणी शिक्षण संस्था,ब्रम्हपूरी जि.चंद्रपूर**

**विषय - बालकांचा मोफत व सक्तीचा शिक्षणाचाहक्क अधिनियम, २००९ यांच्या कलम १८ च्या प्रयोजनार्थ, बालकांना मोफत व सक्तीच्या शिक्षणाचाहक्क नियम, २०११ याच्या नियम ११, पोट नियम (४) अन्वयक शाळांना मान्यता प्रमाणपत्र देण्याबाबत.**

**संदर्भ** -१) शासन निर्णय क्र.एसएफएस-१११४/प्र.क्र४०/एसएम-२मंत्रालय मुंबई दिनांक २६/०२/२०१४
२) शिक्षण उपसंचालक नागपुर यांचे पत्र क्रं प्राथ.ब/स्वयंअर्थ/३०६८ /२०१४ दिनांक ०७/०३/२०१४
३) शिक्षण उपसंचालक नागपुर यांचे पत्र क्रं माध्य/अ-२/२८५१ /२०१४ दिनांक ०५/०३/२०१४
४) गटशिक्षणाधिकारी पंचायत समिती,ब्रम्हपूरी यांचे शाळा तपासणी अहवाल दिनांक २०/०८/२०२१
५) मुख्याध्यापक, स्व.मदनगोपालजी भैय्या पब्लीक स्कुल, ब्रम्हपूरी यांचे पत्र दिनांक २५/०८/२०२१

**महोदय/महोदया,**

संदर्भ पत्र क्र. १ नुसार **नेवजाबाई हितकारिणी शिक्षण संस्था,ब्रम्हपूरी जि.चंद्रपूर** व्दारा संचालित **स्व.मदनगोपालजी भैय्या पब्लीक स्कुल, ब्रम्हपूरी** या इंग्रजी (CBSE) माध्यमाच्या खाजगी शाळेला सन **२०१४-१५ या सत्रापासुन** प्राथमिक ते माध्यमिकचे वर्ग कायमविना अनुदानीत स्वयंअर्थसहाय्यीत तत्वावर शाळा सुरु करण्यासाठी परवानगी दिलेली आहे. संदर्भ पत्र क्र. ५ नुसार शाळेचे मुख्याध्यापकांनी शाळेला मान्यता देणेबाबत प्रस्ताव सादर केलेला आहे

संदर्भ क्र. ४ नुसार, गटशिक्षणाधिकारी, पंचायत समिती,ब्रम्हपूरी यांनी सदर शाळेची तपासणी करून अहवाल या कार्यालयास सादर केलेला आहे.त्या अहवालानुसार सदर शाळेत सद्या इयत्ता १ ते १० चे वर्ग प्रत्यक्ष सुरू आहेत.तसेच सदर शाळा RTE Act-२००९ मधील भौतिक सुविधांच्या मानकांची पूर्तता करण्याचे अटीवर शाळेला मान्यता प्रदान करण्याकरीता शिफारस केलेली आहे. त्या आधारे **दिनांक ०३/०९/२०२१ पासून दिनांक ०२/०९/२०२४ पर्यंत** तीन वर्षाच्या कालावधीसाठी इयत्ता १ ते ८ करीता **स्व.मदनगोपालजी भैय्या पब्लीक स्कुल, ब्रम्हपूरी** या शाळेस खालील अटी व शर्तीच्या पूर्ततेच्या अधीन राहून मान्यता देण्यात येत आहे.

**वरील मान्यता ही खालील शर्तीच्या पूर्ततेच्या अधीन आहे-**

१. मान्यतेचा कालावधी वाढवून मिळणार नाही आणि इयत्ता आठवी नंतर मान्यता किंवा संलग्नता देण्यास कोणत्याही परिस्थितीत कोणतेही बंधन नसेल.
२. बालकांचा मोफत व सक्तीचा शिक्षणाचा हक्क अधिनियम, २००९ (जोडपत्र एक) आणि महाराष्ट्र बालकांचा मोफत व सक्तीचा शिक्षणाचा हक्क अधिनियम, २०११ (जोडपत्र दोन) मधील तरतूदीचे, शाळा पालन करील.
३. शाळा नजीकच्या दुर्बल घटकातील आणि वंचित गटातील बालकांना, पहिल्या इयत्तेतील विद्यार्थी संख्येच्या किमान २५% मर्यादेपर्यंत प्रवेश देईल आणि प्राथमिक शिक्षण होईपर्यंत त्यांना मोफत व सक्तीचे शिक्षण देईल परंतु आणखी असे की, पूर्व प्राथमिक इयत्तांच्या बाबतीत देखील या प्रमाणकाचे अनुपालन करण्यात येईल.
४. परिच्छेद ३ मध्ये निर्दिष्ट केलेल्या बालकांकरीता शाळेला अधिनियमाच्या कलम १२(२) नुसार प्रतिपूर्ती मिळेल, अशी प्रतिपूर्ती मिळण्यासाठी शाळेला स्वतंत्र बँक खाते देण्यात येईल.
५. संस्था/शाळा कोणतीही कॅपिटेशन फी वसूल करणार नाही आणि कोणत्याही छाननी पध्दतीसाठी बालकास किंवा त्याच्या किंवा तिच्या मात्या-पित्यास किंवा पालकास भाग पाडणार नाही.
६. कोणत्याही बालकास वयाच्या पुराव्याच्या अभावी; धर्म, जात, किंवा वंश, जन्मठिकाण किंवा यापैकी कोणत्याही कारणास्तव, शाळेमध्ये प्रवेश नाकारण्यात येणार नाही.
७. (एक) शाळेत प्रवेश दिलेल्या कोणत्याही बालकास तो ज्या इयत्तेत असेल त्याच इयत्तेत रोखुन ठेवले जाणार नाही किंवा प्राथमिक शिक्षण पूर्ण होईपर्यंत काढून टाकण्यात येणार नाही.
(दोन) कोणत्याही बालकास शारीरिक शिक्षा किंवा मानसिक त्रास देण्यात येणार नाही.
(तीन) कोणत्याही बालकास प्राथमिक शिक्षण पूर्ण होईपर्यंत कोणत्याही मंडळाची परीक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक असणार नाही.
(चार) प्राथमिक शिक्षण पूर्ण केलेल्या प्रत्येक बालकास, नियम २३ अन्वये निर्धारित प्रमाणपत्र देण्यात येईल.

(पाच) विकलांग / विशेष गरजा असलेल्या विद्यार्थ्यांच्या अधिनियमाच्या तरतुदीनुसार समावेश करण्यात येईल.

(सहा) अधिनियमाच्या कलम २३(१) अन्वये निर्धारित केलेली किमान अर्हता धारण करणा-या शिक्षकांची नियुक्ती करण्यात येईल. आणखी असे की, अधिनियमाच्या प्रारंभाच्या दिनांकास किमान अर्हता धारण न करणा-या शिक्षकांना अशी किमान अर्हता ५ वर्षाच्या कालावधीत संपादित करावी लागेल.

(सात) अधिनियमाच्या कलम २४(१) मध्ये विनिर्दिष्ट केलेली त्याची / तिची कर्तव्ये शिक्षक पार पाडतील.

(आठ) शिक्षकाने/शिक्षिकेने खाजगी शिकवणीच्या कामात स्वत:ला गुंतवून घेऊ नये, याची सुनिश्चिती शाळा करील.

८. शाळा समुचित प्राधिकरणाने निर्धारित केलेल्या अभ्यासक्रमाच्या आधारे तयार केलेल्या पाठयक्रमाचे पालन करील.

९. शाळा, अधिनियमाच्या कलम १९ मध्ये विहित केल्याप्रमाणे शाळेत उपलब्ध असलेल्या सुविधांच्या तुलनेत विद्यार्थ्यांना प्रवेश देईल.

१०. शाळा अधिनियमाच्या कलम १९ मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या मानकांचे व प्रमाणकांचे पालन करील.

**तपासणीच्या वेळेत शाळेत उपलब्ध असलेल्या सुविधा खालीलप्रमाणे होत्या-**

- शाळेच्या परिसराचे क्षेत्रफळ - **९०५४.०० चौ.मी.**
- एकूण बांधकाम क्षेत्रफळ - **१५४४.६९ चौ.मी.**
- खेळाच्या मैदानाचे क्षेत्रफळ- **७५०९.३ चौ.मी.**
- वर्गखोल्यांची संख्या - **४८**
- कार्यालय-नि-भांडार-नि-मुख्याध्यापकाची खोली - **आहे.**
- मुलांसाठी व मुलींसाठी स्वतंत्र प्रसाधन गृहे- जेथे वापरण्यासाठी व प्रसाधन गृहे आणि आरोग्यदायी स्थितीत ठेवण्यासाठी पुरेसे पाणी असेल - **आहे.**
- पिण्याच्या पाण्याची सुविधा - **आहे.**
- दुपारचे जेवण शिजवण्यासाठी स्वयंपाकघर - **लागु नाही**
- अध्यापनं अध्ययन साहित्य / खेळ व क्रीडा विषयक सामग्री / ग्रंथालय यांची उपलब्धता - **आहे.**
- वाचन साहित्य विनासायास उपलब्ध - **आहे.**
- सर्व सूविधा विना अडथळा (रॅम्प) उपलब्ध आहेत काय? - **आहे.**
- शाळेला संरक्षण भिंत आहे काय? - **आहे.**
- शाळेत अग्निशमन यंत्र आहे काय? - **आहे..**

११. मान्यता नसलेले वर्ग किंवा तुकडया, शाळेच्या नावाने शाळेच्या परिसरात किंवा इतरत्र, चालविता येणार नाहीत.

१२. शाळेची इमारत किंवा इतर बांधकाम किंवा क्रीडांगणहे केवळ शिक्षणाच्या व कौशल्य विकासाच्या प्रयोजनार्थ वापरण्यात येतील.

१३. शाळा, सोसायटी नोंदणी अधिनियम, १८६० (१८६० चा २१) किंवा मुंबई सार्वजनि विश्वस्त व्यवस्था अधिनियम, १९५० अन्वे नोंदणी झालेल्या संस्थेमार्फत चालविण्यात येत आहे.

१४. शाळा कोणत्याही व्यक्तीच्या, गटाच्या किंवा व्यक्ती संघाच्या किंवा इतर कोणत्याही व्यक्तीच्या फायद्याकरिता किंवा कोणताही नफा मिळविण्यासाठी चालविण्यात येत नाही.

१५. शाळेचे लेख सनदी लेखापालाकडून लेखा परिक्षित व प्रमाणित करून घ्यावेत आणि नियमानुसार योग्य लेखा विवरणपत्रे तयार करावीत. प्रत्येक लेखा विवरण पत्राची एक प्रत दरवर्षी जिल्हा शिक्षणाधिका-यांकडे पाठविण्यात यावी.

१६. तुमच्या शाळेला मिळालेला मान्यता संकेतांक **२७१३११११८३०** असा आहे, हा सांकेतांक या कार्यालयाशी कोणताही पत्रव्यवहार करतांना कृपया तो नमूद करावा, याची नोंद घ्यावी.

१७. शिक्षण संचालक / जिल्हा शिक्षणाधिकारी वेळोवेळी मागणी करतील असे अहवाल व माहिती शाळेने सादर करावी किंवा शाळेच्या मान्यतेच्या शर्तीची निरंतर पूर्तता करण्यासाठी किंवा शाळेच्या कामकाजातील त्रुटी दूर करण्यासाठी शासन किंवा स्थानिक प्राधिकरण देईल अशा सूचनांचे पालन करावे.

१८. संस्थेच्या नोंदणीचे कोणतेही नूतनीकरण असल्यास, नूतनीकरण केल्याची सुनिश्चित करावी.

१९. बालकांच्या मोफत व सक्तीचा शिक्षणाचा हक्क अधिनियम - २००९ प्रमाणे शाळेला आवश्यक असणा-या बाबी पूर्ण असने आवश्यक आहे. तसेच संदर्भिय तपासणी अहवालाच्या आधारे व अपूर्ण असलेल्या भौतिक सुविधांच्या **मानकांची पूर्तता तिन महिन्याचे आत पूर्ण करण्याचे अटीवर** शाळेला मान्यता प्रदान करण्यात येत आहे. परंतू प्रत्यक्ष फेरतपासणीच्या वेळी त्यात कोणत्याही प्रकारच्या त्रुटी आढळून आल्यास **आपल्या शाळेची मान्यता त्यापूढे आपोआप संपूष्टात येईल.**

शिक्षणाधिकारी (प्राथ.)
जिल्हा परिषद, चंद्रपूर

**प्रतिलिपी :-** १) मुख्याध्यापक, , **स्व.मदनगोपालजी भैय्या पब्लीक स्कुल, ब्रम्हपूरी** यांना माहितीस अग्रेषीत.

२) गटशिक्षणाधिकारी, पंचायत समिती, ब्रम्हपूरी यांना माहितीस तथा उचित कार्यवाहीस अग्रेषीत.

Secretaty
Nawajabai Hitkarini Education Society.
Bramhapuri 441206

Principal
LMB Public School
Bramhapuri, Distt. Chandrapur

शिक्षणाधिकारी (प्राथ.)
जिल्हा परिषद, चंद्रपूर